# द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांसाठीच्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा विश्लेषणात्मक अभ्यास :- विशेष संदर्भ नाशिक जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

## संशोधक

जाधव योगेश सदाशिव
एम.कॉम.,सेट

## मार्गदर्शक

डॉ. गणेश नारायणराव बोकारे
(एम.कॉम. पीएच.डी.)
वाणिज्य विभाग प्रमुख
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा जि. हिंगोली

# अभ्यास केंद्र

## कै.सौ.कमलाताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

## २०२१-२२

**प्रस्तावना:**

भारत हा देश कृषि क्षेत्रात अग्रेसर राष्ट्र म्हणून ओळखला जातो.जवळपास भारतात २०१९ च्या आकडेवारीनुसार ६,६४,३६९ इतकी ग्रामीण खेडी आहेत.ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करता ग्रामीण भागात वेगवेगळी शेती उत्पादने घेतली जातात. यामध्ये प्रामुख्याने भौगोलिक परिस्थितीनुसार शेती उत्पादनांचा विचार शेतकरी वर्ग करताना दिसतात. यामध्ये भारताला मिळणारी एकुन आर्थिक उत्पन्नापैकी सुमारे १९.९% जी.डी.पी. हा एकूण कृषी उत्पन्नातून मिळतो.भारतीय शेतकरी हे आपआपल्या सोयीनुसार व स्थानिक गरजेनुसार वेगवेगळ्या प्रकारचे फळे व भाजीपाला पीक घेतात.आजचा शेतकरी हा शेती करत असतांना पारंपरिक शेती न करता आधुनिक व अद्यावत शेती पद्धतीचा अवलंब करतांना दिसत आहे. परंतु,बागायती शेती मध्ये प्रामुख्याने फळे देणाऱ्या पिकांचा समावेश होतो. यामध्ये प्रामुख्याने द्राक्ष या पिकाचा विचार करताना शेतकरी वर्ग दिसत आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये जवळपास नाशिक,सांगली,सोलापूर,पुणे व मराठवाड्याचा काही भागात द्राक्ष उत्पादन घेतले जाते. द्राक्ष फळ शेती मुळे मोठ्या प्रमाणात मजुरीच्या स्वरुपात विविध प्रकारचा रोजगार उपलब्ध झालेला आहे. तसेच द्राक्ष उत्पादन घेत असताना मोठ्या प्रमाणात रासायनिक व विद्राव्य खतांचा वापर केला जातो. त्यामुळे रासायनिक खते उत्पादन करणारे व विक्री

करणाऱ्यांचा व्यवसाय सुद्धा तेजीत आहे. व त्याच बरोबर द्राक्ष शेती वरती इतर व्यवसाय सुद्धा अवलंबून आहे. त्या व्यवसायांची उलाढाल करोडो मध्ये आहे. जसे की बँक व वित्तीय संस्था,सिंचन उद्योग,स्टील उद्योग,फर्टीलायझर व्यवसाय,विविध प्रयोगशाळा, ट्रॅक्टर, फवारणी यंत्र, रद्दी पेपर, प्लास्टिक उद्योग,हार्डवेअर इ.हे सर्व व्यावसायिक द्राक्ष शेती उत्पादनामुळे आर्थिक फायद्यात आहेत.परंतु द्राक्ष उत्पादन करणारे शेतकरी हे वाढता द्राक्ष उत्पादन खर्च व द्राक्ष किंमत यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेला दिसतो. या परिस्थितीत द्राक्ष उत्पादकांना मिळणाऱ्या शासकीय योजना असतील किंवा शासकीय वेगवेगळे ध्येय धोरणे असतील यांचा कितपत लाभ मिळतो हा सुद्धा एक महत्वाचा संशोधनाचा भाग आहे. म्हणून द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जेणेकरून या संशोधनामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यास मदत होईल.व तसेच शासनास द्राक्ष किंमत निर्धारण करण्या करिता मदत होईल.

**संशोधन साहित्याचा आढावा:**

द्राक्ष फळपीक विषयक आर्थिक योजनां विषयी संशोधन विषयक माहिती मिव्वीत असतांना यापूर्वी वेगवेगळ्या संशोधकांनी या विषयाला अनुसरून माहिती मिळवलेली आहे.त्यांचा थोडक्यात याठिकाणी उल्लेख करणे गरजेचे

ठरते ;त्यामुळे संशोधन कार्य करतांना नवीन उपायोजना सुचविणे व कार्यान्वित करणे सोयिस्कर ठरेल.

- प्रा.जाधव के.डी. यांच्या “नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन व निर्यातीचे विश्लेषणात्मक अध्ययन” (२००२-२०१२) या शोध प्रबंधात त्यांनी असे म्हटले की, द्राक्ष शेती उत्पादकांची द्राक्ष निर्यातीमुळे परकीय चलनामुळे शेतकऱ्याच्या राहणीमानात सुधारणा होते. परंतु त्यांनी त्यात असे म्हटले की निर्यात करणारे शेकऱ्यांची टक्केवारी ही १८.०१ प्रतिशत इतकी आणि निर्यात न करणारे शेतकरी हे ८१.९९ प्रतिशत इतकी मोठ्या प्रमाणात तफावत दर्शविलेली आहे. व त्याचबरोबर त्यांनी द्राक्ष उत्पादकांना अनेक अडचणी व समस्यांचा समावेश केलेला आहे जसे की,भांडवल,पाणी.वीज,पारंपरिक शेत पद्धत,नैसर्गिक व कृत्रिम अश्या इत्यादि चा समावेश प्रामुख्याने केलेला आहे.

**संशोधन विषयाचे उधिष्टे:**

१) नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा व्यावसायिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य सरकारकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

३) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

४) सरकारकडून मिळालेल्या योजनांमुळे जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांमध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

५) नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन अभ्यासाची गृहीतके:**

१) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मिळालेल्या सरकारी योजनांमुळे आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली.

२) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना सरकारकडून मिळालेल्या विविध योजनांमुळे शेतीपूरक व्यवसायांमध्ये वाढ होत आहे.

३) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध योजनांमुळे सामाजिक स्थिती मध्ये सुधारणा होत आहे.

४) द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना असणाऱ्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्याने त्यांना अनेक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन अध्ययन विषयासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येईल.

- **प्राथमिक माहिती स्त्रोत**

  सदर विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक महितीचा अवलंब करण्यात येईल. प्राथमिक माहिती मिळविण्याच्या पद्धतीमध्ये सर्वेक्षण,

मुलाखती,प्रश्नावली व नमूना पद्धती हे नाशिक जिल्ह्यातील निवडक तालुक्यातून करण्यात येईल. संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील ०८ तालुक्यातील प्रत्येकी ०५ गावांची निवड करून त्यामधून प्रत्येक गावातील १० शेतकऱ्यांचे असे एकूण जवळपास ४०० नमुने आर्थिक अध्ययन करण्यासाठी निवड केली आहे.

- **दुय्यम माहितीचा स्त्रोत**

सदर विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम माहितीचा वापर करून माहिती संकलन केले जाईल. या दुय्यम माहिती स्त्रोतामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, वेगवेगळे अहवाल, तसेच इंटरनेट वरील संबंधित माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

**संशोधन विषयाचे महत्व:**

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये द्राक्ष फळ उत्पादनाचा सरकार कडून मिळणाऱ्या आर्थिक बाबींचा चिकित्सक अभ्यास करण्याचा हेतु म्हणजे गेल्या काही वर्षापासून द्राक्ष शेतकऱ्यांचे उत्पन्न हे ज्या महागाईच्या प्रमाणात वाढ व्हायला हवी होती त्या प्रमाणात झालेली नाही. द्राक्ष शेतीवरती खूप छोटे–मोठे व्यवसाय अवलंबून आहे. त्यामुळे तेथील भौगोलिक प्रदेशाचा विकास मोठ्या प्रमानात झालेला आहे परंतु उत्पादकांची सद्य आर्थिक परिस्थिति बिकट

असल्याची दिसत आहे. म्हणून या विषयामध्ये द्राक्ष उत्पादकांना शासकीय स्तरावरती उत्पन्नाची शाश्वती मिळविण्यासाठी,द्राक्ष उत्पादकांना विक्री व विपणन विषयक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरती होणाऱ्या बदलांची माहिती देण्यासाठी, बाजार समितीमध्ये द्राक्ष फळ विक्रीचा समावेश होण्यासाठी,वेगवेगळ्या अर्थविषयक अनुदानांची माहिती व अंमलबजावणी करणे आवश्यक बनले आहे.या सर्वांचा हेतु म्हणजे देशाच्या एकूण उत्पन्नात वाढ करणे, आर्थिक सक्षम व साक्षर बनविणे, द्राक्ष पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे,उत्पादनासाठी लागणाऱ्या घटकांचा सर्वसाधारण खर्च अशा अनेक आर्थिक प्रश्नांना या संशोधन कार्यातून महत्वाचे प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

**संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन क्षेत्र हे महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मिळनाऱ्या शासकीय योजना व आर्थिक घटकांचा विचार केला जाणार आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन केल्यामुळे द्राक्ष उत्पादन खर्च व विक्री किंमत यातील तफावत लक्षात येऊन शेतकऱ्यांना आर्थिक नियोजन करता येईल व तसेच द्राक्ष हमीभाव ठरविण्यासाठी शासनास मदत होईल. आर्थिक अध्ययन केल्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर लक्षात येईल व त्याचबरोबर द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना निर्यातीसाठी अनुदानपर प्रोत्साहन योजना व त्यांची अंमलबजावणी याची व्यापकता लक्षात येते.

१) सदर संशोधन नाशिक जिल्ह्यापूर्तेच मर्यादित आहे.

२) संशोधनासाठी केवळ द्राक्ष या फळ पिकासाठी मिळणाऱ्या योजनांचे आर्थिक अध्ययन

करण्यात येणार आहे.

३) संशोधनासाठी सन २०१७-१८ ते २०२१-२२ असा ५ वर्षाचा कालखंड निश्चित करण्यात आलेला आहे.

**प्रकरणांची संभाव्य रचना:**

- प्रकरण पहिले :- प्रस्तावना
- प्रकरण दुसरे :- संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा
- प्रकरण तिसरे :- द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या योजनांचा अभ्यास.
- प्रकरण चौथे :- नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष पीक पद्धतीचा अभ्यास
- प्रकरण पाचवे :- माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण
- प्रकरण सहावे :- निष्कर्ष व शिफारशी
    - संदर्भसुची
    - परिशिष्ट

**संशोधनाचे वार्षिक नियोजन** :

१. प्रथम वर्ष :- द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या योजनांचा अभ्यास.
२. द्वितीय वर्ष :- द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या मुलाखती व प्रश्नावली भरून घेणे.
३. तृतीय वर्ष :- माहितीचे संकलन आणि विश्लेषण, निष्कर्ष व शिफारशी.
४. चौथे वर्ष :- प्रबंध तयार करणे.

**संदर्भ सूची :**

१) “कृषि अर्थसहाय्य योजना” श्री.जगनाथ शिंदे, गोदावरी प्रकाशन,नाशिक
२) “शासकीय कर्ज योजना” मनोज पाटील ,जळगाव.
३) “भारतीय अर्थव्यवस्था” निर्मल देसाई आणि भालेराव ,निराळी प्रकाशन,पुणे २०१५
४) कृषि अर्थशास्त्र,डॉ.नीता वाणी ,प्रशांत पब्लिकेशन ,जळगाव
५) कृषि अर्थशास्त्र,डॉ.विजय कवि मंडन, मंगेश प्रकाशन,नागपुर
६) Agricultural problems in India, Singh and Sandhu.
७) www.maharashtragrapes.com
८) www.vikaspedia.com
९) https://ift.onlinelibrary.wiley.com/doi/abs/10.1111/1541-4337.12934

**संशोधक**

**मार्गदर्शक**

**श्री. जाधव योगेश सदाशिव**

**प्रा.डॉ. गणेश नारायणराव बोकारे**

वाणिज्य विभाग प्रमुख,

नागनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , औंढा जि. हिंगोली